अनुदानित/कायम विनाअनुदानीत /विना अनु.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ १८५/२०१४
पुणे १ दिनांक:- २६/ ०२/२०१४

प्रति,
अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
रयत शिक्षण संस्थेचे
साधना विद्यालय हडपसर,पुणे २८

**विषय :-** बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम११,पोट नियम(४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपला दिनांक ०६.०८.२०१२ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक **०१ एप्रिल २०१३** पासून दिनांक **३१ मार्च २०१६** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता ५वी ८ वी अनु.** वर्गाकरिता **रयत शिक्षण संस्थेचे साधना विद्यालय हडपसर,पुणे २८** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

५८.मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

५९. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

६०. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

६१. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

६२. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६३. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात,किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

६४.**(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)** विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)**अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची/तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि